महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १५/१०/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील भाग्यश्री कॉलनी परसोडा शितलवाडी रामटेक येथे दिनांक १४/१०/२२ चे ०२.३० वा. ते ०३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्रीमती गंगाबाई दिपक गेडाम, वय ६२ वर्षे, रा. भाग्यश्री कॉलनी परसोडा शितलवाडी रामटेक ही आपल्या घरी रात्रीला झोपली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील आलमारी मधील सोन्या—चांदीचे दागिने व पैसे असा एकुण १,०३६००/—रू. चा मुद्देमाल तसेच फिर्यादीच्या घराशेजारील राहणारे आशिष चिंटुजी बिसेन याचे घरातुन १६,३००/—रू. असा एकुण कि. १,१९,९००/—रू. चा मुद्देमाल आरोपीने घराचे कडी—कोंडी तोडुन घराच्या आत प्रवेश करून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्रीकांत लांजेवार मो.क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा किरणापुर येथे दिनांक १३/१०/२२ चे १५.०० वा. ते दिनांक १४/१०/२२ चे १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— गजानन संतोष वांदे, वय ५३ वर्ष, रा. किरणापूर ता. रामटेक यांच्या घरी कोणीही हजर नसतांना अज्ञात आरोपीने त्यांचे घरी दाराचे कुलुप तोडून आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी पेटीमध्ये ठेवलेले १) नगदी १५,०००/—रू २) सोन्याचे मनी १ ग्राम कि ३,०००/—रू. असा एकुण १८,०००/रू चा माल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक विशाल महालकर मो.नं. ९९२२९९६५८८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत मौजा चोखाळा येथे दिनांक १३/१०/२२ चे २२.०० वा. ते दिनांक १४/१०/२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— कुमारी चंद्रमनी हंसाराम हटवार, वय २२ वर्ष रा. चोखाळा ता. मौदा जिल्हा नागपुर हि घरी हजर नसतांना अज्ञात आरोपीने घरातील दरवाज्याचा लॉंक तोडुन घराच्या आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने सोन्याचे दागिने असा एकुण किंमत १९,५००/—रु. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगळे मो.नं ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील कुकडी पांजरा येथे दिनांक ११/१०/२२ चे १८.०० वा. ते दिनांक १२/१०/२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्री सुरेंद्र शंकरलाल बजाज, वय ५८ वर्ष, रा. सहयोग नगर बिड ह.मु. मेटपांजरा हे एन पी ईन्फ्रा प्रा. लि कंपनीमध्ये कार्यरत असून कुकडी पांजरा शिवारात काम सुरू आहे. घटना तारखेला १७ इलेक्ट्रीक पोलवरील अंदाजे २७०० मिटर ॲल्युमिनियम तार किंमती २५,०००/—रू. व २,५०० मिटर ११ केव्ही अरमाड एक्स एल पी ई ३ सि. ग ३०० स्वे एम.एम. केबल वायर किंती ६२,०००/—रू. असा एकुण कि. ८७,०००/—रूपयेचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने कापून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दत्तात्रय कोलटे मो.नं. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**